# *उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर*

## वृक्ष प्राधिकरण

मा. वृक्ष प्राधिकरण समितीवर नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक करण्यासाठी खालील पात्रता धारकाकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

१ कृषी/वन/उदयान विदया/विषयाची पदवी किंवा डिप्लोमा तसेच शास्त्र शाखेची पदवी किंवा पदविका असणे आवश्यक असेल.
२ वृक्षांची लागवड/संवर्धन/स्थलांतरण अधिक्षक/वा पर्यावरण सुरक्षा विषयाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असलेल्या पात्र व्यक्तिंना प्राधान्य
३ वृक्ष प्राधिकरणावर बिनसरकारी संघटनांचे प्रतिनिधी म्हणून नियुक्त होण्यास नामनिर्देशित व्यक्ती शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागाकडील नोंदणीकृत बिनसरकारी संघटनेचा सक्रिय सदस्य असणे आवश्यक आहे.
४ वृक्षांचे रोपण, जतन व पुनर्रोपण किंवा पर्यावरण संवर्धन क्षेत्रातील विशेष ज्ञान व पाच ते दहा वर्षे अगर अधिक प्रत्यक्ष अनुभव
५ राष्ट्रीय पातळीवर कार्यरत बिनसरकारी संघटनेचा नामनिर्देशित सदस्य असावा.
६ नामनिर्देशित सदस्य स्वतंत्र बिनसरकारी संघटनेचा व्यक्ति असावा.

**तरी उपरोक्त पात्र असणा-या प्रतिनिधींनी विहित नमुन्यात संपुर्ण माहितीसह भरलेले अर्ज (साक्षांकित प्रतीसह) ऑन लाईन/ऑफ लाईन पध्दतीने** दिनांक ०६/०९/२०२३ पासुन दिनांक २०/०९/२०२३ रोजी पर्यत **अर्ज मागविण्यात येत आहे. अर्जाचा नमुना व निकष महापालिकेच्या** www.umc.gov.in **या संकेत स्थळावर फॉर्म उपलब्ध असून अर्ज करणाऱ्या प्रतिनिधींनी अर्ज download करुन भरुन Scan करुन सदर अर्ज** msd.umc.gov.in@gmail.com **या ईमेल आयडी ऑनलाईनवर पाठवावे व ऑफलाईन पध्दतीने अर्ज करणाऱ्या प्रतिनिधींनी सदर अर्ज सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सचिव कार्यालयात जमा करावेत. सदर जाहिरातीमध्ये कधी कोणत्याही कारणास्तव बदल/रदद/स्थगिती देण्याचा अधिकार महापालिका प्रशासक तथा आयुक्त यांना असेल, कृपया याची नोंद घ्यावी.**

**प्रशासक तथा आयुक्त**
**उल्हासनगर महानगरपालिका**

उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर

# शुध्दीपत्रक

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ कलम ३ (३) नुसार प्रत्येक महापालिकेस आवश्यकतेनुसार वृक्षप्राधिकरणावर बिनसरकारी संघटनेचे सदस्य नेमणूक करण्यासाठी जा.क्रं.उमपा/स.का./५४/२०२३ दिनांक ०५/०९/२०२३ रोजी दिनांक ६/०९/२०२३ साठी जाहीर प्रकटन प्रसिध्दीसाठी देण्यात आले असुन सदर जाहीर प्रकटनमध्ये **सुधारणा करण्यात येत आहे.** त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या वृक्षप्राधिकरणावर बिनसरकारी संघटनांच्या प्रतिनिधींना वृक्षप्राधिकरणाचे सदस्य (नामनिर्देशित) म्हणून नेमणूक करण्यासाठी **online/offline दिनांक ०६/०९/२०२३ ते २०/०९/२०२३ पर्यंत** अर्ज मागविण्यात येत आहे. **त्यासाठी अर्जाचा नमुना व निकष महापालिकेच्या www.umc.gov.in या संकेत स्थळावर फॉर्म उपलब्ध असून अर्ज करणाऱ्या प्रतिनिधींनी अर्ज download करुन भरुन Scan करुन सदर अर्ज msd.umc.gov.in@gmail.com या ईमेल आयडी ऑनलाईनवर पाठवावे व ऑफलाईन पध्दतीने अर्ज करणाऱ्या प्रतिनिधींनी सदर अर्ज सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सचिव** कार्यालयात जमा करावेत. मुदतीनंतर येणाऱ्या **अर्जांचा व** अपूर्ण भरलेल्या अर्जाचा **विचार केला जाणार नाही. सदर जाहिरातीमध्ये कधी कोणत्याही कारणास्तव बदल/रदद/स्थगिती देण्याचा अधिकार महापालिका प्रशासक तथा आयुक्त यांना असेल, कृपया याची नोंद घ्यावी.**

प्रशासक तथा आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:

# *उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर*

## वृक्ष प्राधिकरण

वृक्ष प्राधिकरण समिती, उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत नामनिर्देशित सदस्यत्वाकरीता अर्ज

पासपोर्ट आकाराचा फोटो

- अर्जदाराचे संपूर्ण नाव :—
- जन्म दिनांक व वय :—
- संपूर्ण पत्ता ((जवळच्या खूणेसह) :—
- भ्रमणध्वनी क्रमांक :—
- ई—मेल आयडी (आवश्यक) :—
- नोकरी/व्यवसाय बद्दल माहिती :—
  प्रकार व पत्ता —
- शैक्षणिक अर्हता :—
- अनुभव वर्षे :—
- बिनसरकारी संस्थेचे नाव व संपूर्ण पत्ता:—
- बिनसरकारी संस्था राष्ट्रीय पातळीवर कार्यरत आहे/नाही.
- बिनसरकारी संस्थेचा मा. धर्मादाय आयुक्त/मा. सह निबंधक यांचे कार्यालयाकडील नोंदणी क्रमांक :—
- बिनसरकारी संस्थेचे सक्रिय सदस्य असल्याबाबतचे संस्थेचे पत्र सोबत जोडले आहे/नाही.
- बिनसरकारी संस्थेची सामाजिक वनीकरण विभागाकडील नोंदणी क्रमांक:—

अर्जदाराची स्वाक्षरी

# स्वंयघोषणा

मला मान्य आहे की, अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र अर्जदारांना मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसाठी बोलाविण्यात येईल. सदर प्रकरणी निवड करणेबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार वृक्ष प्राधिकरणास आहे. कोणतेही कारण न देता कोणत्याही कारणास्तव यात बदल / रदद /स्थगिती देण्याचा अधिकार मा. वृक्ष प्राधिकरण यांना असेल. वरील पद लाभकारक/पगारी/कायम नसून ही सेवा स्वेच्छा सेवा आहे. सर्व कागदपत्रे माझ्याद्वारे स्वाक्षरीकृत असून स्पष्ट आहेत आणि जर कोणताही कागदपत्र स्पष्ट न आढळल्यास ते नाकारले जावु शकतात आणि वरील सर्व माहिती माझ्या माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळुन आल्यास याबाबत माझ्यावर योग्य ती कारवाई होईल, याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची स्वाक्षरी